महाराष्ट्र शासन

जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

दूरध्वनी क्र. : 0240-2334285, Email ID:- dpo.abadi@gmail.com

जा.क्र.जिनिस/प्रमा/जिवायो/2020-21/ 889 दिनांक : 31 /03/2021

**प्रशासकीय मान्यता आदेश.**

वाचा :- 1) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र.जिवायो-1007/प्र.क्र.39/का-1444, दिनांक 16 फेब्रुवारी, 2008

2) महाराष्ट्र शासन अर्थसंकल्पीय अंदाज 2020-21 ओ-नियोजन विभाग, 46-जिल्हा योजना, औरंगाबाद.

3) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.डिएपी-1010/प्र.क्र.203/का.1481, दि.9/8/2010 व नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : डिएपी-2014/प्र.क्र.198/का.1481, दि.27 ऑगस्ट, 2014, महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन परिपत्रक क्र.डिएपी-1012/ प्र.क्र.280/का.1481, दि.12/09/2012, कक्ष अधिकारी, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.डिएपी-1012/प्र.क्र.405/कार्यसन-1481, दि.21/09/2012.

4) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांची मान्य टिपणी दि.15/01/2021, दि.01/03/2021 व दि.10/03/2021 आणि दिनांक 09/03/2021 रोजी विभागातील जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची आयोजित बैठकीत दिलेले निर्देश तसेच दि.22/03/2021 रोजीची बैठक.

5) संबंधित तांत्रिक समितीने दिनांक 22/03/2021 रोजी दिलेली सर्वसाधारण तांत्रिक सहमतीबाबतचे इतिवृत्त.

6) संचालक, पीएचसीडीबीएस, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, औरंगाबाद यांचे पत्र क्र.पीएचसीडीबीएस/प्रस्ताव जीडसीबी/ 2021/03, दि.23/03/2021

विषय :- जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2020-21

प्रशासकीय मान्यता आदेश

महाराष्ट्र शासन, नियोजन विभागाचे वरील शासन निर्णय क्रमांक 1 नुसार जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2020-21 करीता मंजूर केलेली अर्थसंकल्पिय तरतूद जिल्हास्तरावरील अंमलबजावणी अधिकाऱ्यांना वितरीत करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्या अधिकारांचा वापर करुन मी जिल्हाधिकारी, औरंगाबाद या आदेशान्वये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2020-21 च्या निधीतुन संदर्भाधीन क्रमांक 4 अन्वये प्राप्त निर्देश आणि संदर्भाधीन क्रमांक 5 अन्वये संबंधित समितीने सर्वसाधारण तांत्रिक सहमती प्रदान करुन, संदर्भाधीन क्रमांक 6 अन्वये संचालक, पीएचसीडीबीएस, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, औरंगाबाद यांनी प्रशासकीय मान्यतेसह निधीची मागणी केल्यानुसार सन 2020-21 मध्ये **नाविण्यपूर्ण योजनेतंर्गत** मंजूर नियतव्यय रु.1139.25 लक्ष च्या मर्यादेत रु.179.92 लक्ष एवढ्या रक्कमेच्या प्रस्तावास नमूद लेखाशिर्षानुसार खालीलप्रमाणे अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे.

याद्वारे सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी, औरंगाबाद यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी सदर रक्कम कोषागारातून आहंरीत करुन संबंधित कार्यान्वयीन / अंमजबजावणी यंत्रणेस अदा करावी.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2020-21 (मागणी क्रमांक ओ-46) (रु.लाखात)

| अ.क्र. | नाविण्यपूर्ण योजनेचे नाव | उदिष्ट शिर्ष | अर्थसंकल्पीय तरतूद | प्रस्तावीत कामाची प्रशासकीय मान्यता रक्कम | प्रस्तावीत कामास यापूर्वी वितरीत केलेला निधी | प्रस्तावीत कामास या आदेशाद्वारे वितरीत निधी | एकूण वितरीत निधी | योजना राबविणाऱ्या यंत्रणेचे नाव | आहरण व संवितरण अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | "Genetic Strategies for conservation of important native livestock breeds of Marathwada - Deoni Cow, LalKhandari Cow and Osmanabadi Goat" - या मराठवाडयातील पशुधनांच्या जातींची संवर्धन व जतनाच्या दृष्टीने जनुकीय शुध्दता तपासणी व संशोधनात्मक अभ्यास करणे | 31 | 1139.25 | 179.92 | 0.00 | 0.00 | 0.00 | कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, औरंगाबाद | सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, औरंगाबाद |
| | एकूण :- | | 1139.25 | 179.92 | 0.00 | 0.00 | 0.00 | | |

प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये 179.92 लक्ष (एकूण अक्षरी रुपये एक कोटी एकोणऐंशी लक्ष ब्यॅण्णव हजार फक्त)

बी.डी.एस.साठी कोषागार क्रमांक व डि.डी.ओ कोड - 3101001039

Scanned with CamScanner

| संचालक, पीएचसीडीबीएस, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, औरंगाबाद यांनी प्रस्तावीत केलेल्या नाविण्यपूर्ण योजनेचा तपशील (रुपये लाखात) | | |
|---|---|---|
| अ. क्र. | नाविण्यपूर्ण योजनेचे नाव / तपशील | कामाची सर्वसधारण तांत्रिक सहमती रक्कम |
| 01 | "Genetic Strategies for conservation of important native livestock breeds of Marathwada - Deoni Cow, LalKhandari Cow and Osmanabadi Goat" - या मराठवाड्यातील पशुधनांच्या जातींची संवर्धन व जतनाच्या दृष्टीने जनुकीय शुध्दता तपासणी व संशोधनात्मक अभ्यास करणे. | 179.92 |
| | एकूण :- | 179.92 |

| सदरील कार्यक्रमाकरीता वितरीत निधी खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा | | |
|---|---|---|
| 01 | नाविण्यपूर्ण योजना | मागणी क्रमांक ओ-46, 3451 सचिवालयीन आर्थिक सेवा, 101, नियोजन आयोग - नियोजन मंडळ, (47) जिल्हा योजना-औरंगाबाद, (47) (02) नाविण्यपूर्ण योजना, 31, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर), (3451 1688) |

**अटी व शर्ती :**

1. प्रस्तावीत प्रकल्पाकरीता अपेक्षीत खर्चास संबंधित तांत्रिक समितीने सर्वसाधारण तांत्रिक सहमती प्रदान केली आहे. सदर प्रस्तावास संबंधित समितीने सर्वसाधारण तांत्रिक सहमती प्रदान केली असली तरी, अंतिमत: सदर प्रस्तावास आयुक्त, पशुसंवधन विभाग अथवा सक्षम प्राधिकाऱ्यांची तांत्रिक मंजूरी प्राप्त होण्याच्या अटीच्या अधिन राहून सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सबब सदर प्रस्तावास सक्षम प्राधिकाऱ्यांची तांत्रिक मंजूरी प्राप्त करुन घेण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित अंमलबजावणी यंत्रणेची राहील.
2. नाविण्यपूर्ण योजना राबविण्यासंदर्भात नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.डिएपी-1010/प्र.क्र.203/का.1481, दि.09 ऑगस्ट, 2010 व शासन निर्णय क:डिएपी-1014/प्र.क्र.198/का.1481, दि.27/08/2014 अन्वये सर्वसमावेशक मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. प्रतावीत कामाच्या अनुषंगाने शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनाप्रमाणे कामांची अनुज्ञेयता तपासणे तसेच शासन निर्णयातील निकषाची पूर्तता होत असल्याबाबतची खात्री करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित अंमलबजावणी यंत्रणेची राहील.
3. योजनानिहाय मंजूर निधी ज्या लेखाशिर्षाखाली मंजूर करण्यात आला आहे त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा. निधी खर्च करण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सुचना विचारात घेऊन निधी योजनांवर खर्च करावा. सदर कामावर मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्च होणारी नाही याची दक्षता घ्यावी, असा जास्तीचा खर्च झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत कार्यान्वयीन यंत्रणा / उपभोक्ता विभागाची राहील. पुर्व परवानगीशिवाय वरीलप्रमाणे मंजूर कामात/जागेत/बांधकाम आकारमानात/खरेदीच्या बाबीत/तपशिलात / तांत्रिक मंजूरी आदेशात/अंदाजपत्रकात कसलाही बदल करता येणार नाही. या आदेशाद्वारे मंजूर करण्यात येत असलेली तरतूद 31 मार्च, 2022 पर्यंत खर्च होईल याची दक्षता घ्यावी. सदरचा निधी हा योजनांतर्गत असून तो योजनेतर बाबींसाठी खर्च करण्यात येवू नये.
4. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत मंजूर असलेल्या ज्या योजनांना केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध होतो अश्या योजनांच्या बाबतीत केंद्र शासनाचा हिस्सा प्रथम खर्च करण्यात यावा.
5. जिल्हा योजनेची अंमलबजावणी संबंधित विभागाच्या विहीत निकषानुसार करावयाची असून खर्चावर व तांत्रिक बाबीवर संबंधित प्रशासकिय विभागाचे नियंत्रण असेल.
6. या कार्यक्रमांतर्गत मंजूर कामाची गुणवता राखण्याची जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा / उपभोक्ता विभागाची राहील. तसेच जिल्हा वार्षिक योजनेच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र, काम पूर्णत्वाचे दाखले, खर्चाचा ताळमेळ व विनीयोजन लेखे, लेखा परिक्षण इत्यादी बाबतची सर्व कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा / उपभोक्ता विभागाची राहील, तसेच जिल्हा वार्षिक योजनेतील/ योजनेच्या अंमलबजावणीतील गैरव्यवहार, लेखा आक्षेप, लोकलेखा समिती, विधीमंडळ कामकाज इत्यादी बाबींसाठी संबंधीत कार्यान्वयीन यंत्रणा / उपभोक्ता विभाग व त्यांचे प्रशासकिय विभाग जबाबदार राहतील. तसेच सदर योजनेची अंमलबजावणी करीत असतांना काही न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी कार्यानवयीन यंत्रणा / उपभोक्ता विभागाची राहील.
7. सदर योजना/कामासाठी प्रचलीत नियमानुसार शासकीय मालकीची जागा उपलब्ध करावी. शासकीय मालकीची निर्विवाद जागा उपलब्ध असल्याशिवाय कुठल्याही परिस्थितीत कार्यारंभ आदेश (Work Order) निर्गमित करण्यात येऊ नये. कुठल्याही परिस्थितीत वैयक्तिक अथवा खाजगी स्वरुपाच्या जागेवर बांधकाम / कार्यक्रम करण्यात येऊ नये. जागेबाबत काही वाद / तांत्रिक अडचणी / न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची / उपभोक्ता विभागाची राहील.

Scanned with CamScanner

8. कार्यान्वयीन यंत्रणा/ उपभोक्ता विभागानी याव्दारे मंजूर कामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यापूर्वी सदरची कामे/ जागा नियोजित पाटबंधारे /जलविदयूत/ पाणी पुरवठा अथवा अन्य इतर प्रकल्पाच्या जलाशयाखाली जाण्याची शक्यता नाही याची खात्री करणे त्यांना बंधनकारक आहे.

9. या कार्यक्रमांतर्गत होणा-या खर्चाचा हिशोब विहित पध्दतीनुसार स्वतंत्रणे वेगळा ठेवण्यात यावा, सदर कामाचा इतर कोणत्याही योजनांतर्गत योजना / कार्यक्रम अथवा योजनेतर कामात अंतर्भाव नाही याची दक्षता घ्यावी. संबंधित यंत्रणेने **या कार्यक्रमांतर्गत होणारा मासिक खर्च व भौतिक प्रगतीचा अहवाल दरमहा 5 तारखेपर्यंत या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.**

10. सदर काम सुरु होण्यापूर्वी अंदाजपत्रकासोबत भविष्यातील देखभाल व दुरुस्तीचे हमीपत्र विहित नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे. प्रस्तावीत नवीन कामांच्या अंदाजपत्रकात भविष्यातील देखभाल दुरुस्तींच्या बाबींकरीता निधीचा अंतर्भाव/समावेश नसल्याबाबतची खात्री करण्याची संपूर्ण जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची/ उपभोक्ता विभागाची राहील. प्रस्तावीत कामाच्या देखभाल दुरुस्तीच्या निधीचा समावेश प्रस्तावीत अंदाजपत्रकामध्ये करण्यात येऊ नये.

11. प्रस्तावीत कामे / खरेदी सुरु करण्यापूर्वी सदर प्रस्तावास / कामांस सक्षम प्राधिकारी यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केलेले मुळ अंदाजपत्रक / तांत्रिक मान्यता आदेश या कार्यालयास सादर करणे कार्यान्वयीन यंत्रणेस बंधनकारक आहे.

12. या आदेशाद्वारे मंजूर कामांची तपासणी करण्याचे अधिकार तपासणी पथकास असतील, अश्या तपासणी पथकास आवश्यक असलेले सर्व अभिलेख उपलब्ध करुन देण्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणांची/ उपभोक्त विभागाची राहील.

13. सदर निधी मंजूरीनंतर प्रत्यक्ष खर्च करण्यापूर्वी त्या-त्या कालावधीतील निवडणूक आयोग यांच्या निवडणुक संदर्भातील निर्गमीत होणाऱ्या आदर्श आचारसंहितेच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करावी.

14. सदर योजनेतील कामे/खरेदी बाबतच्या सर्व तांत्रिक अटी / बाबी पूर्ण करुनच, सदरील कामे/खरेदी करण्यात यावी. खरेदीबाबत/निधी खर्च करतांना वित्त विभागाच्या / शासनाच्या विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणे कार्यान्वयीन यंत्रणेस / उपभोक्ता विभागास बंधनकारक राहील.

15. या आदेशान्वये वितरीत होणारा निधी हा याआधी मंजूर झालेल्या अपूर्ण कामांवर खर्च होणार असेल तर याआधीचे निधी मंजूरीचे लेखाशिर्ष व या आदेशान्वये वितरीत होणाऱ्या निधीचे लेखाशिर्ष वेगळे नसल्याची खात्री करावी व लेखाशिर्ष वेगळे असल्यास ते या कार्यालयाचे निदर्शनास आणून देण्याची जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची / उपभोक्ता विभागाची राहील.

16. सदर कामाचा निधी वितरीत करण्यात आल्याप्रमाणे तात्काळ कामास सुरुवात करावी. तसेच सदरील कामांवर खर्च करतांना या योजनेतून यापूर्वी घेण्यात आलेल्या कामांची पुनरावृत्ती होता कामा नये.

17. या कार्यक्रमांतर्गत वितरीत केलेल्या निधीचा एकत्रीत खर्चाचा मासिक ताळमेळ महालेखापाल कार्यालयात ठेवलेल्या लेख्याशी घालून तिमाही खर्च ताळमेळाची विवरणपत्रे या कार्यालयास सादर करावी.

18. या आदेशाद्वारे मंजूर करण्यात येणारे काम / योजनाबाबत दिनांक 16/02/2008 च्या शासन निर्णयामधील निर्देशाप्रमाणे कार्यवाही करावी व नवीन योजनांच्या बाबतीत सदरहु शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक 1.8 चे काटेकोरपणे पालन करावे.

19. या आदेशान्वये वितरीत करण्यात येणारा निधी शासनाच्या विहीत / प्रचलित कार्यपध्दतीचा अवलंब करूनच विकास कामांवर खर्ची टाकण्यात यावा. कुठल्याही परिस्थितीत निधीच्या उपलब्धतेशिवाय कामांना तांत्रिक मंजूरी प्रदान करून, शासनावर नव्याने दायीत्व निर्माण करु नये. कोणत्याही परिस्थितीत तांत्रिक मान्यता / प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्तीचा निधी कामांवर खर्च करु नये. तसेच निधी मागणी करीता प्रस्तावीत केलेली कामे ही सदर योजनेच्या धोरणात्मक शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनांनुसार अनुज्ञेय असल्याची खात्री करण्याची संपूर्ण जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची / उपभोक्ता विभागाची राहील.

20. नियोजन विभागाचे शासन निर्णय दिनांक 16/02/2018 मध्ये नमूद केल्यानुसार जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत मंजूर नियतव्यय / उपलब्ध निधीच्या मर्यादेपेक्षा जास्तीची कामे मंजूर करणे अथवा मंजूर कामे दोन वर्षात पूर्ण न करणे यासाठीची संपूर्ण जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची / उपभोक्ता विभागाची राहील.

21. या आदेशान्वये उपलबध करून दिलेला निधी ज्या कामांवर खर्ची टाकण्यात आला आहे, अशा कामांची यादी, कामाचे सुस्पष्ट साक्षांकित फोटो निधी मागणीच्या प्रस्तावासोबत जिल्हा नियोजन समिती कार्यालयास प्राप्त झाल्याशिवाय, पुढील उपलब्ध होणारा निधी वितरीत केला जाणार नाही.

22. कोणत्याही परिस्थितीत प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्यानंतर कामाची स्थळ पाहणी करूनच, काम भौतिकदृष्टया / तांत्रिकदृष्टया पूर्ण झाल्याची खात्री झाल्याशिवाय कामांना निधी वितरीत करण्यात येऊ नये. तसेच ज्या कामांवर निधी खर्च होत असेल, अशा कामांची यादी संबंधित ग्रामपंचायत, पंचायत समिती तसेच संबंधित विभागाच्या तालुका स्तरावरील व जिल्हा स्तरावरील कार्यालयांच्या नोटीस बोर्डवर लावून, सदर यादी जिल्हयाच्या वेबसाईटवरही ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची / उपभोक्ता विभागाची राहील.

Scanned with CamScanner

23. प्रस्तावीत कामे/खरेदी संदर्भात शासन नियमानुसार सक्षम प्राधिकारी / कार्यान्वयीन यंत्रणेच्या वरिष्ठ कार्यालयाची आवश्यक त्या ठिकाणी पूर्व मंजूरी प्राप्त करुन घेणे तसेच शासनाच्या प्रचलीत / विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुनच, सदरची कामे/खरेदीची कार्यवाही विहीत मुदतीत पूर्ण करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची / उपभोक्ता विभागाची राहील.

24. पुर्व परवानगीशिवाय उपभोक्ता विभागास तसेच कार्यान्वयीन यंत्रणेस मंजूर कामात / जागेत / बांधकाम आकारमानात / खरेदीच्या बाबीत/तपशिलात / तांत्रिक मान्यता आदेशात तसेच अंदाजपत्रकात कसलाही बदल करता येणार नाही. तसेच प्रस्तावीत कामे/खरेदी तांत्रिक मान्यता आदेशानुसार / अंदाजपत्रकानुसार भौतिकदृष्ट्या कालमर्यादेत पूर्ण करुन, शिल्लक / बचत निधी विहीत मुदतीत अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीव्दारे जिल्हा नियोजन समिती कार्यालयास परत / समर्पित करण्यात यावा. निधी व्यपगत झाल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची / उपभोक्ता विभागाची राहील.

25. या आदेशाव्दारे वितरीत करण्यात येणारा निधी सदर योजनेच्या मार्गदर्शक सुचना / धोरणात्मक शासन निर्णयातील तरतूदीनुसार खर्च करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची / उपभोक्ता विभागाची राहील. योजना राबवितांना / सदर कामाबाबत काही तांत्रिक अडचणी / वाद / तक्रारी / न्यायालयीन प्रकरण अथवा अन्य कुठलेही प्रकरण उद्‌भवल्यास अथवा वित्तिय अनियमितता झाल्याचे निदर्शनास आल्यास त्यास सर्वस्वी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा / उपभोक्ता विभाग जबाबदार राहतील.

26. प्रस्तावीत कामे/खरेदी झाल्यानंतर सदर कामांची यादी संबंधित कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावून जिल्हयाच्या वेबसाईटवरही ठेवण्यात यावी. तसेच प्रस्तावीत कामे / खरेदी पूर्ण झाल्यानंतर सदर कामांची यादी, कामांच्या फलनिष्पतीचा संक्षिप्त अहवाल तसेच कामाचे साक्षांकित सुस्पष्ट फोटो जिल्हा नियोजन समिती कार्यालयास सादर करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची / उपभोक्ता विभागाची राहील.

(सुनील चव्हाण, भाप्रसे)
**जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,**
**जिल्हा नियोजन समिती, औरंगाबाद**

**<u>प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता :</u>**

1. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, औरंगाबाद
2. संचालक, पीएचसीडीबीएस, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, औरंगाबाद
3. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद
4. सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, औरंगाबाद
5. वरिष्ठ कोषागार अधिकारी, औरंगाबाद.
6. लेखाधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

**<u>प्रत माहितीस्तव सस्नेह सादर.</u>**

1 मा.प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
2. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
3. महालेखापाल, नागपूर-2.

Scanned with CamScanner